# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
# Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No.513
dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act, No. VI of 2017)

**Dr. Siddharthavinayaka P. Kane** — **डॉ सिद्धार्थविनायक प. काणे**
Ph. D. — पीएच.डी.
**Vice-Chancellor** — **कुलगुरू**

**Re-accredited by NAAC "A" Grade**

**Office :** Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Premises, Ravindranath Tagore Marg, Nagpur - 440 001.
**Tel. :** 0712-2523045, Fax : (0712) 2555701 / **E-mail :** vc@nagpuruniversity.nic.in


रातुमनावि/म.वि.वि./बृहत आराखडा/३८०

२७ एप्रिल २०१८.

## — आवाहन —

### विद्यापीठाचा बृहत आराखडा : २०१९–२० ते २०२३–२४
### (Perspective Plan )

महाराष्ट्र शासन एक व्यापक शैक्षणिक धोरण तयार करणाच्या विचारात आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनिमय, २०१६ च्या अनुच्छेद १०७ नुसार ही प्रत्येक विद्यापीठाची जबाबदारी आहे. आतापर्यंतच्या प्रथेनुसार प्रत्येक विद्यापीठ आपल्या स्तरावर हया दृष्टीने बृहत आराखडा तयार करता असे. परंतु आता शासनाच्या उच्च स्तरावर विद्यापीठ आणि एकुण शिक्षणक्षेत्राशी संबंधीत सर्व लाभ धारकांना ( **Stake holders** ) हा बृहत आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेत समाविष्ठ करण्याचा निर्णय झाला आहे. म्हणुन हया प्रक्रियत शिक्षक, विद्यार्थी, पालक, विद्यापीठ व महाविद्यालयातील कर्मचारी, उद्योजक, समाजसेवक, शासकीय अधिकारी, राजकीय नेते इ. समाजातील विविध घटकांचे मत व विचार मागवण्यात येणार आहेत. अश्या तऱ्हेने प्राप्त सर्व माहितीचे व मतमतांतराचे विश्लेषण करुन विद्यापीठाचा २०१९–२० ते २०२३–२४ हया कालावधीसाठी बृहत आराखडा तयार करण्यात येईल. तो शासनास सादर करुन त्याआधारे शासन व्यापक शैक्षणिक धोरण तयार करणार आहे. हया प्रक्रियेकरिता विविध समाजघटकांसाठी प्रश्नावली विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सर्वाना नम्र विनंती आहे की, आपल्याशी संबंधीत प्रश्नावली संकेतस्थळावर भरुन सहकार्य करावे.

(डॉ.सिध्दाविनायक काणे)
कुलगुरु